# रेणुका अष्टक

लक्ष कोटी चंड किरण सुप्रचंड विलपती |
अंब चंद्र वदन बिंब दीप्तीमाजि  लोपती |
सिंह शिखर अचल वासी मूळपीठ नायिका |
धर्म अर्थ काम मोक्ष कल्प वृक्ष रेणुका  ॥ 1 ॥

आकर्ण अरुण  वर्ण नेत्र श्रवणी दिव्य कुंडले |
डोलताति पुष्पहार भार फार दाटले |
अष्टदांडि बाजूबंदी कांकणादि मुद्रिका |
धर्म अर्थ काम मोक्ष कल्प वृक्ष रेणुका ॥ 2 ॥

इंद्रनीळ पद्मराग पाचहीर  वेगळा |
पायघोळ बोरमाळ चंद्हार वेगळा |
पैंजणादि  भूषणेचि लोपल्याति  पादुका |
धर्म अर्थ काम मोक्ष कल्प वृक्ष रेणुका  ॥ 3 ॥

इंद्र चंद्र विष्णु ब्रह्म नारदादि  वंदिती |
आदि अंत ठावहीन आदि शक्ती भगवती |
प्रचंड चंडमुंड खंड विखंडकारि अंबिका |
धर्म अर्थ काम मोक्ष कल्प वृक्ष रेणुका  ॥ 4 ॥

पर्वताग्रवासी पक्षि अंब  अंब बोलती |
विशाल शालवृक्ष रानि ध्यानी मनि डोलती |
अवतारकृत्यसार जडमुढादि  तारका |
धर्म अर्थ काम मोक्ष कल्प वृक्ष रेणुका  ॥ 5 ॥

अनंत ब्रम्हांड कोटि पूर्वमुखा बैसली |
अनंत गुण अनंत शक्ति विश्वजननि भासली |
सव्यभागि दत्त अत्री वाम भागि कालिका |
धर्म अर्थ काम मोक्ष कल्प वृक्ष रेणुका ॥ 6 ॥

पवित्र मातृक्षेत्र धन्य वास पुण्य आश्रमी |
अंब दर्शनासि भक्त - अभक्त येति आश्रमी |
म्हणुनि विष्णुदास नीज लाभ पावला फुका |
धर्म अर्थ काम मोक्ष कल्प वृक्ष रेणुका  ॥ 7 ॥

॥  रेणुका माता की जय ॥

eAstroHelp